# प्रकरण पाचवे

# बेरड समुदायाचे आर्थिक, शैक्षणिक जीवन आणि बदल

# प्रकरण पाचवे
# बेरड समुदायाचे आर्थिक, शैक्षणिक जीवन बदल

## प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणामध्ये बेरड समुदायातील आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेतलेला आहे. या प्रकरणामध्ये बेरड समुदायाची पूर्वीची व सद्यपरिस्थितीतील आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास तसेच त्या परिस्थितीमध्ये बदल झाल्याच्या माहितीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## बेरड समुदायाचे आर्थिक जीवन आणि बदल

बेरड समुदायातील लोकांचे आर्थिक उत्पन्न मिळविण्याची साधने ही पूर्वीपासूनच वेगवेगळी असलेली दिसून येतात. त्यांचे ठराविक्र असे इतर समाजातील जाती-जमातीप्रमाणेच आर्थिक उत्पन्नाची साधने दिसून येत नाहीत. तेव्हा त्यांची पूर्वीची व सद्यपरिस्थितीतील आर्थिक परिस्थिती कशी होती? व सद्यपरिस्थिती कशी आहे? याबद्दलचा अभ्यास या विभागात केलेला आहे.

## व्यवसाय :

इतर समुदायाचा जसा ठराविक व्यवसाय आहे, (उदा. धनगर समुदायाचा व्यवसाय शेळ्या-मेंढ्या पाळणे, वैदू समुदायाचा व्यवसाय जंगलातील वनोऔषधे गोळा करून गावोगावी विकणे, कैकाडी समुदायाचा व्यवसाय शेतकऱ्यांना टोपली, कणग्या करून देणे, वडार, पाथरवट, बेलदार समुदायाचा व्यवसाय बांधकाम करणे, तर सापवाला, गारूडी, माकडवाला, अस्वलवाला, नंदी बैलवाला, कोल्हाटी, डोंबारि, गोंधळी इत्यादी समुदायांचा व्यवसाय हा लोकांचे मनोरंजन किंवा कसरती करणे व त्यातून आपला उदरनिर्वाह करणे इ.) तसा बेरड समुदायाचा ठराविक असा व्यवसाय पूर्वी पासूनच नव्हता. तेव्हा ते हाताला मिळेल ते काम करत गेले. अशा प्रकारे बेरड समुदायातील लोकांच्या व्यवसायामध्ये विविधता आढळून येते. माणगांव गावातील बेरड समुदायातील लोकांच्या व्यवसायाची माहिती पुढील सारणी क्र.५.१ मध्ये घेतली दिलेली आहे.

**सारणी क्र.५.१**


**बेरड समुदायातील लोकांची पूर्वीची व सद्यपरिस्थितीतील व्यावसायिक स्थितीची तुलनात्मक माहिती**

| अ.क्र. | व्यवसाय | पूर्वीची वारंवारिता | टक्केवारी | सद्यस्थितीची वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेती | १८ | ३६.0 % | १८ | ३६.0 % |
| २ | शेतमजूर | १६ | ३२.0 % | १६ | ३२.0 % |
| ३ | वॉचमन / पहारेकरी | ६ | १२.0 % | ६ | १२.0 % |
| ४ | द्रारू गाळणे | १0 | २0.0 % | 0 | 0.0 % |
| ५ | इतर | 0 | 0.0 % | १0 | २0.0 % |
| | **एकूण** | ५0 | १00.0 % | **५0** | १00.0 % |

वरील सारणी क्र. ५.१ मधून असे स्पष्ट होते की, पूर्वी वेरड समुदायातील बहुसंख्य (३६%) लोकांचा व्यवसाय हा शेती होता. त्यानंतर काही (३२%) शेतमजूरी करणे, दारू गाळणे (२0%) तर उर्वरीत सर्वात कमी (१२%) लोक वॉचमन किंवा पहारेकरीचा व्यवसाय करत होते.बेरड समुदायातील लोकांची सद्यपरिस्थितीतील व्यावसायिक संदर्भातील माहिती सारणी क्र.५.१ मध्ये दिलेली आहे. वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, सद्यपरिस्थितीत वेरड समुदायातील बहुसंख्य (३६%) लोक शेती व्यवसाय करतात. त्यानंतर काही (३२%) शेतमजूर, इतर व्यवसाय करतात, (१0%) तर उर्वरीत सर्वात कमी (१२%) लोक पहारेकरी किंवा वॉचमनचा व्यवसाय करतात.प्रस्तुत सारणी क्र.५.१ चे विश्लेषण आलेखाद्वारे व्यवस्थित स्पष्ट होईल.

## आलेख क्रमांक ५.१

**बेरड समुदायातील लोकांची पूर्वीची व सद्यस्थितीतील व्यावसायिक स्थिती दर्शविणारा आलेख**




वरील सारणी क्र.५.१ मध्ये दिलेल्या बेरड समुदायातील पूर्वीची व सद्यपरिस्थितीतील व्यवसायाची तुलनात्मक माहितीवरून असे स्पष्ट होते की, व्यावसायिकदृष्ट्या पूर्वीची जशी परिस्थिती होती तशीच ती आजही आहे. काही प्रमाणात (२0%) व्यवसायात बदल झाल्याचे वरील आकडेवारीवरून दिसते. असे असले तरी सामाजिक सर्वेक्षण केल्यानंतर असे आढळून आले की वरील सर्व व्यवसाय हे परंपरागत व्यवसाय म्हणून चालू आहेत. मग त्यातून उत्पादन मिळो अगर न मिळो परंतु वास्तविक मात्र बेरड समुदायातील लोक आपल्या परंपरागत व्यवसायाबरोबरच इतरही व्यवसाय करताना दिसून येतात. सध्या हे लोक शासकीय नोकऱ्या, निमशासकीय नोकऱ्या, कायम स्वरूपाचा व्यवसाय, हंगामी स्वरूपाचा व्यवसाय, किरकोळ व्यवसाय, वाहन चालविण्याचा व्यवसाय, किराणा दुकानाचा व्यवसाय, एखाद्या कामाचे कंत्राट घेण्याचा व्यवसाय इत्यादी व्यवसाय करताना दिसतात. म्हणजेच उपजीविकेसाठी या लोकांनी बदलत्या सामाजिक वातावरणाशी तडजोड केलेली दिसते.

### सारणी क्र.५.२
### बेरड समुदायातील कुटुंबांचे व्यवसायामधून व सर्व मार्गांनी मिळून होणारे पूर्वीचे व सद्यपरिस्थितीचे मासिक उत्पन्नाची तुलना दर्शविणारी माहिती

| अ.क्र. | मासिक उत्पन्न | पूर्वीची वारंवारिता | टक्केवारी | सद्यस्थितीची वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५०१ ते १००० रू | ८ | १६.० % | ० | ० % |
| २ | १००१ ते २००० रू | १६ | ३२.० % | ८ | १६.० % |
| ३ | २००१ ते ३००० रू | १४ | २८.० % | ६ | १२.० % |
| ४ | ३००१ ते ४००० रू | १२ | २४.० % | २४ | ४८.० % |
| ५ | ४००१ ते ५००० रू | ० | ० % | १२ | २४.०% |
| | एकूण | ५० | १०० % | ५० | १०० % |


वरील सारणी क्र.५.२ मध्ये पूर्वी बेरड समुदायातील कुटुंवाचे व्यवसायामधून व सर्व मार्गांनी मिळून होणारे मासिक उत्पन्नाची माहिती दिलेली आहे. या सारणीवरून असे स्पष्ट होते की बेरड समुदायातील बहुसंख्य (३२%) लोकांचे उत्पन्न हे १००१ ते २००० रू इतके होत होते. काही बेरड समुदायातील लोकांचे उत्पन्न हे (२८%) २००१ ते ३,००० रू. व (२४%) ३००१ रू ते ४००० रू तर सर्वात कमी (१६%) वेरड लोकांचे उत्पन्न हे ५०१ ते १००० रू. होत होते.

वरील सारणी क्र.५.२ मध्ये सद्यपरिस्थितीतील वेरड समुदायातील कुटुंबाचे व्यवसायामधून व सर्व मार्गांनी मिळून होणाऱ्या मासिक उत्पन्नाची माहिती दिलेली आहे. या दिलेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते की सद्यपरिस्थितीत वेरड समुदायातील वहुसंख्य (४८%) लोकांचे मासिक उत्पन्न हे ३००१ ते ४००० रू. इतके होते. काही वेरड लोकांचे (२४%) उत्पन्न हे ४००१ ते ५००० रू, (१६%) १००० ते २००० रू तर सर्वात कमी (१२%) वेरड लोकांचे कुटुंबाचे उत्पन्न हे २००१ ते ३००० रू इतके होते.

वरीलप्रमाणे सारणी क्र.५.२ मध्ये पूर्वी बेरड समुदायातील लोकांच्या कुटुंबाचे व्यवसायामधून व सर्व मार्गांनी मिळून होणाऱ्या मासिक उत्पन्नाची माहिती व विश्लेषण तसेच सद्यपरिस्थितीतील बेरड लोकांचे व्यवसायामधून व सर्व मार्गांनी मिळून होणारे मासिक उत्पन्नाची माहिती व तिचे विश्लेषण दिलेले आहे. सदर दोन्ही सारणीतून बेरड समुदायातील लोकांच्या कुटुंबातील पूर्वीच्या व सद्यपरिस्थितीच्या व्यवसायामधून व सर्व मार्गांनी मिळून होणाऱ्या मासिक उत्पन्नाची तुलना केलेली आहे. ही तुलना आलेखाद्वारे स्पष्ट केल्यास अधिक सुस्पष्ट होईल.

### आलेख क्र.५.२

### बेरड समुदायातील कुटुंबाचे व्यवसायामधून व सर्व मार्गांनी मिळून होणारे पूर्वीचे व सद्यपरिस्थितीचे मासिक उत्पन्नाची तुलना दर्शविणारा आलेख.




### सारणी क्र.५.३

### पूर्वीच्या व सद्यपरिस्थितीतील बेरड समुदायातील कुटुंबांचा होणारा सरासरी मासिक खर्चाची तुलना दर्शविणारी माहिती

| अ.क्र. | मासिक खर्च | पूर्वीचा चवारंवारिता | टक्केवारी | सद्यस्थितीची वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५०१ ते १००० रू | १४ | २८.० % | ० | ० % |
| २ | १००१ ते २००० रू | २४ | ४८.० % | १४ | २८.० % |
| ३ | २००१ ते ३००० रू | १२ | २४.० % | २४ | ४८.० % |
| ४ | ३००१ ते ४००० रू | ० | ० % | १२ | २४.० % |
| | एकूण | ५० | १०० % | ५० | १०० % |

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR


वरील सारणी क्र.५.३ मध्ये बेरड समुदायातील कुटुंबाचा होणारा सरासरी मासिक खर्चाची माहिती दिलेली आहे. या दिलेल्या सारणीतील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की बेरड समुदायातील बहुसंख्य (४८%) लोकांचा होणारा सरासरी मासिक खर्च हा १००१ ते २००० रू.इतका होता. काही बेरड लोकांचा (२८%) ५०१ ते १००० इतका होता, तर सर्वात कमी (२४%) लोकांचा सरासरी मासिक खर्च हा २००१ ते ३००० रू.इतका होता.

प्रस्तुत सारणी क्र.५.३ मध्ये सद्यपरिस्थितीतील बेरड समुदायातील कुटुंबाचा होणारा सरासरी मासिक खर्चाची माहिती दिलेली आहे. या दिलेल्या सारणीतील आकडेवारून असे दिसून येते की बेरड समुदायातील बहुसंख्य (४८%) लोकांचा होणारा सरासरी मासिक खर्च हा २००१ ते ३००० रू इतका आहे. काही (२८%) बेरड लोकांचा १००१ ते २००० रू. इतका आहे. तर सर्वात कमी (२४%) लोकांचा सरासरी मासिक खर्च हा ३००१ ते ४००० रू. इतका आहे.

वरीलप्रमाणे सारणी क्र.५.३ मध्ये पूर्वी बेरड समुदायातील लोकांच्या कुटुंबाचा होणारा सरासरी मासिक खर्चाची माहिती व तिचे विश्लेषण तसेच सद्यपरिस्थितीतील बेरड समुदायातील कुटुंबाचा होणारा सरासरी मासिक खर्चाची माहिती व तिचे विश्लेषण दिलेले आहे. सदर दोन्ही सारणीतून बेरड समुदायातील लोकांच्या कुटुंबातील पूर्वीच्या व सद्यपरिस्थितीत होणाऱ्या सरासरी मासिक खर्चाची तुलना केले आहे.तुलना आलेखाद्वारे केल्यास ती अधिक सुस्पष्ट होईल.

**आलेख क्र.५.३**

**पूर्वीच्या व सद्यपरिस्थितीतील बेरड समुदायातील कुटुंबांचा होणारा सरासरी मासिक खर्चाची तुलना दर्शविणारा आलेख**




### सारणी क्र.५.४
### बेरड समुदायातील लोकांनी आतापर्यंत केलेल्या बचतीचा उपयोग दर्शविणारी माहिती

| अ.क्र. | बचतीचा उपयोग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | घर बांधले | १४ | २८.० % |
| २ | मुलांचे लग्न केले | १६ | ३२.० % |
| ३ | औषध पाणी | २० | ४०.० % |
| | **एकूण** | ५० | १०० % |

प्रस्तुत सारणी क्र.५.४ मध्ये बेरड समुदायातील लोकांनी आतापर्यंत केलेल्या बचतीच्या उपयोगाची माहिती दिलेली आहे. वरील माहितीवरून असे स्पष्ट होते की, बेरड समुदायातील बहुसंख्य (४०%) लोकांनी बचतीचा उपयोग दवाखान्यासाठी केला. काही बेरड लोकांनी (३२%) मुलांचे लग्न करण्यासाठी तर उर्वरित (२८%) बेरड लोकांनी घर बांधण्यासाठी बचतीचा उपयोग केला. सदर माहितीचे विश्लेषण पुढील आलेखाद्वारे दिलेले आहे.

### आलेख क्र.५.४
### बेरड समुदायातील लोकांनी आतापर्यंत केलेल्या बचतीच्या उपयोगाची माहिती दर्शविणारा आलेख




वरीलप्रमाणे सारणी क्र.५.१ ते सारणी क्र. ५.४ पर्यंत बेरड समुदायातील लोकांची पूर्वीची व सद्यपरिस्थितीतील व्यावसायिक स्थितीची तुलनात्मक माहिती व तिचे विश्लेषण

दिलेले आहे. सदर बेरड समुदायातील व्यावसायिक स्थितीची आणखी काही माहिती सारणी क्र.५.५ मध्ये दिलेली आहे ती पुढीलप्रमाणे

**सारणी क्र.५.५**

**व्यावसायिक स्थितीची इतर माहिती**

| अ.क्र. | परिवर्त्य | उत्तरांचे प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्वी तुमची शेती होती का? | होय | २८ | ५६.0% |
| | | नाही | २२ | ४४.0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| २ | सद्यपरिस्थितीत आहे का? | होय | २८ | ५६.0% |
| | | नाही | २२ | ४४.0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ३ | पूर्वी तुम्ही जनावरे पाळत होता का? | होय | २७ | ५४.0% |
| | | नाही | २३ | ४६.0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ४ | सद्यपरिस्थितीत पाळता का? | होय | २८ | ५६.0% |
| | | नाही | २२ | ४४.0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ५ | तुम्ही सहकारी सोसायटीचे सदस्य होता का? | नाही | २८ | ५६.0% |
| ६ | सद्यपरिस्थितीत आहात का? | होय | ४५ | ९0.0% |
| | | नाही | ५ | १0.0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ७ | पूर्वी तुम्ही कर्ज घेतले होते का? | होय | २३ | ६६.0% |
| | | नाही | २७ | ५४.0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ८ | सद्यपरिस्थितीत घेतला का? | होय | ३३ | ६६.0% |
| | | नाही | १७ | ३४.0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ९ | पूर्वी कर्ज कोणाकडून घेतला होता? | घेतलेलेच नाही | २७ | ५४.0% |
| | | बँक | 0२ | 0४.0% |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सोसायटी | ०३ | ०६.0% |
| | | पाहूणे | १८ | ३६.0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| १0 | सद्यपरिस्थितीत कोणाकडून घेतला आहे ? | घेतलेच नाही | १७ | ३४.0% |
| | | बँक | १६ | ३२.0% |
| | | सोसायटी | १४ | २८.0% |
| | | पाहूणे | ०३ | ०६.0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ११ | तुम्ही वडिलोपार्जित व्यवसायात सुधारणा / वदल करू इच्छिता का? | होय | ५0 | १00 % |
| १२ | असल्यास का? | व्यवसायामधून योग्य ते उत्पन्न मिळत नाही. | ५0 | १00 % |

वरील सारणी क्र.५.५ मध्ये मुलाखत अनुसूचीद्वारे वेरड समुदायातील उत्तरदात्यांकडून त्यांच्या समुदायातील लोकांची पूर्वीची व सद्यपरिस्थितीतील व्यावसायिक स्थितीची जी विस्तृत माहिती दिलेली आहे तिचे विश्लेषण पुढीलप्रमाणे...

**शेती :**

मुलाखत अनुसूचीद्वारे वेरड समुदायातील उत्तरदात्याकडून त्यांच्या शेती व्यवसायाबद्दल माहिती विचारले असता उत्तरदात्याकडून उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की, बहुसंख्य (५६%) वेरड लोकांची पूर्वी शेती होती तर उर्वरीत (४४%) वेरड लोकांची पूर्वी शेती नव्हती. सद्यपरिस्थितीत पूर्वी ज्या बेरड लोकांची शेती होती ती आजही दिसून येते. पण ज्यांची शेती पूर्वी नव्हती त्यांची सद्यपरिस्थितीतही शेती नाही. वेरड लोकांची शेती व्यवसायासंदर्भातील सद्यपरिस्थितीतील आकडेवारी पाहिली असता पूर्वीचीच आकडेवारी दिसून येते. ती अशी की आजच्या स्थितीत बहुसंख्य (५६%) वेरड लोकांची शेती आहे पण उर्वरीत (४४%) वेरड लोकांची शेती नाही.

**पाळीव प्राणी / जनावरे :**

प्रस्तुत सारणीवरून असे दिसून येते की पूर्वी वेरड समुदायातील बहुसंख्य (५४%) वेरड लोक आपल्या व्यवसायाला जोडधंदा म्हणून जनावरे पाळत होते. तर उर्वरीत (४६%) वेरड लोक जनावरांची सोय होत नसल्यामुळे पाळत नसत. सद्यपरिस्थितीतही बहुसंख्य (५६%) वेरड लोक जनावरे पाळत नाहीत तर उर्वरीत (४४%) वेरड लोक जनावरे पाळतात.

**सहकारी सोसायटीचे सदस्य :**

वेरड समुदायातील उत्तरदात्यांना तुम्ही पूर्वी सहकारी सोसायटीचे सदस्य होता का ? असा प्रश्न विचारला असता उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की पूर्वी वेरड समुदायातील लोक सहकारी सोसायटीचे सदस्य होत नव्हते. सद्यपरिस्थितीत मात्र वेरड समुदायातील लोक सहकारी सोसायटीचे सदस्य होताना दिसतात. सद्यस्थितीत वहुसंख्य (९0%) वेरड लोक सहकारी सोसायटीचे सदस्य आहेत व उर्वरीत (१0%) वेरड लोक सहकारी सोसायटीचे सदस्य नाहीत.

**कर्ज पद्धत :**

पूर्वी वेरड समुदायातील लोक कमी जास्त प्रमाणात इतरांकडून कर्ज घेताना दिसतात. पूर्वी वहुसंख्य (५४%) वेरड लोक इतरांकडून कर्ज घेत नव्हते. परंतु उर्वरीत (४६%) वेरड लोक मात्र इतरांकडून कर्ज घेत होते. वेरड लोकांना कर्ज कशासाठी घेतले होते ? असा प्रश्न विचारला तेव्हा उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की घर वांधण्यासाठी आणि लग्न करण्यासाठी वेरड लोक कर्ज घेत होते. तसेच त्यांना पूर्वी कर्ज कोणाकडून घेतला होता ? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्याकडून मिळालेल्या उत्तरादाखल माहितीवरून असे स्पष्ट होते की बहुसंख्य (३६%) वेरड लोक हे आपल्या पाहूण्यांकडून किंवा नातेवाईकांकडून कर्ज घेत असत. तर वाकीचे (६%) वेरड लोक सोसायटीकडून व उर्वरीत (४ .0%) वेरड लोक हे वँकेकडून कर्ज घेत असत.

सद्यपरिस्थितीत बहुसंख्य (६६ .0%) वेरड लोक कर्ज घेताना दिसतात. तर उर्वरीत (३४%) वेरड लोक कर्ज घेताना दिसत नाहीत. सामाजिक सर्वे केल्यानंतर असे दिसून आले की हे लोक घर बांधण्यासाठी, लग्न करण्यासाटी, जमिन घेण्यासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी इ. कारणासाठी कर्ज घेतात. तसेच सद्यपरिस्थितीत बहुसंख्य (३२%) वेरड लोक बँकेकडून कर्ज घेतात तर बाकीचे (२८%) वेरड लोक सोसायटी व सर्वात कमी (६ .0%) बेरड लोक आपल्या पाहूण्यांकडून किंवा नातेवाईकांकडून कर्ज घेताना दिसतात.

### वडिलोपार्जीत व्यवसायात सुधारणा किंवा बदल :

वेरड समुदायातील उत्तरदात्यांना तुम्ही वडिलोपार्जीत व्यवसायात सुधारणा किंवा बदल करू इच्छिता का ? असा प्रश्न विचारला तेव्हा उत्तरदात्याकडून मिळालेल्या उत्तरादाखल माहितीवरून असे स्पष्ट होते की, वेरड समुदायातील सर्व (१00%) लोक आपल्या वडिलोपार्जीत व्यवसायात सुधारणा किंवा बदल करू इच्छितात. तसेच त्याचे कारण विचारले असता असे दिसून येते की वडिलोपार्जीत व्यवसायातून वेरड लोकांना योग्य ते उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे ते त्या व्यवसायात सुधारणा किंवा बदल करू इच्छितात.

## बेरड समुदायातील शैक्षणिक स्थिती विषयीची माहिती

पूर्वी वेरड समुदायातील लोकांमध्ये शिक्षणाबदलचा दृष्टीकोन अयोग्य नकारात्मक असलेला दिसून येतो. सद्यापरिस्थितीत मात्र वेरड समुदायातील लोकांमध्ये शिक्षणाबद्दलचा दृष्टीकोन योग्य, सकारात्मक असलेला दिसतो. पूर्वीच्या आणि सद्यपरिस्थितीतील बेरड समुदायातील लोकांमध्ये असलेला शिक्षणाबद्दलच्या दृष्टीकोनामध्ये खूपच बदल झाल्याचे दिसते. हा बदल नक्कीच सामाजिक परिवर्तनाचा परिणाम आहे. तेव्हा पूर्वी असलेला शिक्षणाबद्दलचा वेरड लोकांचा दृष्टीकोन, विचार, मते, समजुती, गैरसमजूती कशा होत्या? तसेच बदलत्या परिस्थितीनुसार त्या बदलत्या आहेत की नाही? बदलल्या असल्यास त्या किती प्रमाणात बदलल्या आहेत? त्याचप्रमाणे सद्यपरिस्थितीत असलेला शिक्षणाबद्दलचा दृष्टिकोन, विचार, मते समजूती, गैरसमजूती कशा आहेत? तसेच शिक्षण घेतलेल्या वेरड लोकांचे त्यांच्या समुदायामध्ये व समाजामध्ये त्यांना असलेले स्थान पूर्वी कसे होते? व आजच्या स्थितीत कसे

आहे? याविषयीची विस्तृतपणे माहिती सारण्या व विशिष्ट ठिकाणी आलेख काढून पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

मुलाखत अनुसूची व सामाजिक सर्वेक्षण केल्यानंतर वेरड समुदायातील कुटुंबप्रमुखांच्या व वृद्ध लोकांच्या निरक्षरतेचे प्रमाण जास्त असलेले दिसून आले. जेव्हा वेरड समुदायातील उत्तरदात्यांना पूर्वी शिक्षणावद्दलचे तुमचे मत काय होते ? असा प्रश्न विचारला तेव्हा उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरदाखल माहितीवरून असे स्पष्ट होते की पूर्वी वेरड लोकांचे शिक्षणाबद्दलचे मत अयोग्य होते. त्याचप्रमाणे अयोग्य असल्यावद्दलची कारणे विचारली असता पुढील कारणे प्रामुख्याने दिसून येतात. पहिले कारण म्हणजे शिक्षणामुळे कोणताच फायदा होत नाही, दुसरे म्हणजे शिक्षणाला जास्त खर्च येतो आणि तिसरे म्हणजे शिक्षणामुळे सुशिक्षित बेकारीमध्ये वाढ होते इ.

वरीलप्रमाणे पूर्वी वेरड समुदायामध्ये शिक्षणावद्दलचे मत अयोग्य असल्या पाठीमागची कारणे दिलेली आहेत. वरील अयोग्य असलेली कारणे व आकडेवारी माहिती पुढील सारणी क्र. ५.६ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र.५.६**

**बेरड समुदायातील उत्तरदात्यांमध्ये शिक्षणाबद्दलचे मत अयोग्य असलेल्या कारणांचे प्रमाण दर्शविणारी माहिती**


| अ.क्र. | शिक्षणाबद्दलचे मत अयोग्य असल्याची कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शिक्षणामुळे कोणताच फायदा होत नाही. | १२ | २४.0 % |
| २ | शिक्षणाला जास्त खर्च येतो. | १0 | २0.0 % |
| ३ | शिक्षणामुळे सुशिक्षित वेकारीमध्ये वाढ होते. | २८ | ५६.0 % |
| | **एकूण** | **५0** | **१00.0 %** |

वरील सारणी क्र.५.६ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते की, पूर्वी वेरड समुदायातील वहुसंख्य (५६.0%) वेरड उत्तरदात्यांच्या मते शिक्षणामुळे सुशिक्षित वेकारीमध्ये वाढ होते. तर वाकीच्या (२४.0%) वेरड उत्तरदात्यांच्या मते, शिक्षणामुळे कोणताच फायदा

होत नाही. तर उर्वरीत (२०%) बेरड उत्तरदात्यांच्या मते शिक्षणाला जास्त खर्च येतो. म्हणून त्यांना शिक्षण घेणे अयोग्य वाटते.

**आलेख क्रमांक ५.५**

**बेरड समुदायातील उत्तरदात्यांमध्ये शिक्षणाबद्दलचे मत अयोग्य असलेल्या कारणांचे प्रमाण दर्शविणारा आलेख**




सद्यपरिस्थितीत बेरड समुदायातील उत्तरदात्यांच्या मते शिक्षण घेणे योग्य आहे. त्यांना शिक्षण घेणे योग्य का आहे? असा प्रश्न विचारला असता दिलेल्या माहितीवरून पुढील कारणे आढळून आली. पहिले कारण म्हणजे शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. दुसरे कारण म्हणजे शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या हक्कांची, अधिकारांची व कर्तव्यांची जाणिव होते आणि तिसरे कारण म्हणजे शिक्षणामुळे व्यक्ती आपला दर्जा सुधारू शकते इ.


वरीलप्रमाणे सद्यपरिस्थितीत बेरड समुदायामधील शिक्षणाबद्दलचे मत योग्य असल्याची कारणे दिलेली आहेत. तेव्हा योग्य असलेल्या कारणांचे प्रमाण किती आहे याची आकडेवारी माहिती पुढील सारणी क्र.५.७ मध्ये दिली आहे.

### सारणी क्र.५.७
### सद्यपरिस्थितीतील बेरड समुदायातील उत्तरदात्यांमध्ये शिक्षणाबद्दलचे मत योग्य असलेल्या कारणांचे प्रमाण दर्शविणारी माहिती

| अ.क्र. | शिक्षणाबद्दलचे मत योग्य असल्याची कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगिण विकास होतो. | १५ | ३0.0 % |
| २ | शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या हक्कांची, अधिकारांची, कर्तव्याची जाणीव होते. | ७ | १४.0 % |
| ३ | शिक्षणामुळे व्यक्ती आपला दर्जा सुधारू शकते. | २८ | ५६.0 % |
| | **एकूण** | **५0** | **१00.0 %** |

वरील सारणी क्र.५.७ वरून असे स्पष्ट होते की बेरड समुदायातील बहुसंख्य (५६%) बेरड लोकांच्या मते, शिक्षणामुळे व्यक्ती आपला सामाजिक दर्जा सुधारू शकते तर बाकींच्या (३0%) बेरड लोकांच्या मते शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगिण विकास होतो तर उर्वरीत (१४.0%) बेरड लोकांच्या मते, शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या हक्कांची, अधिकारांची व कर्तव्याची जाणीव होते. म्हणून त्यांना सद्यपरिस्थितीत शिक्षण घेणे योग्य वाटते.

### आलेख क्रमांक ५.६
### सद्यपरिस्थितीतील बेरड समुदायातील उत्तरदात्यांमध्ये शिक्षणाबद्दलचे मत योग्य असलेल्या कारणांचे प्रमाण दर्शविणारा आलेख



वरीलप्रमाणे वेरड समुदायातील उत्तरदात्यांचे पूर्वीचे व सद्यपरिस्थितीतील शिक्षणाबद्दलचे मत योग्य की अयोग्य? योग्य असल्यास त्याची कारणे कोणते? व त्याचे प्रमाण किती? तसेच अयोग्य असल्यास त्याची कारणे कोणती? व त्याचे प्रमाण किती? या विषयीची तुलनात्मक आकडेवारी माहिती व तिचे विश्लेषण दिलेले आहे.

**सारणी क्र. ५.८**

**पूर्वीच्या स्थितीमधील बेरड समुदायातील मुलींच्या शिक्षणाविषयीची स्थिती दर्शविणारी माहिती**

| अ.क्र. | मुलींच्या शिक्षणाला मान्यता | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ८ | १६.0 % |
| २ | नाही | ४२ | ८४.0 % |
| | **एकूण** | **५0** | **१00.0 %** |

वरील सारणी क्र.५.८मध्ये मुलाखत अनुसूचीद्वारे वेरड समुदायातील उत्तरदात्यांकडून मिळवलेली माहिती दिलेली आहे. वरील माहितीवरून असे दिसून येते की पूर्वी बेरड समुदायातील बहुसंख्य (८४.0%) उत्तरदाते आपल्या मुलींच्या शिक्षणाला मान्यता देत नव्हते तर उर्वरीत सर्वात कमी (१६.0%) उत्तरदाते आपल्या मुलींच्या शिक्षणाला मान्यता देत होते.

सद्यपरिस्थितीतील वेरड समुदायातील मुलींच्या शिक्षणाविषयीचा विचार केल्यास असे दिसते की वेरड समुदायातील सर्व लोक सद्यस्थितीत मुलींच्या शिक्षणाला मान्यता देतात.

**सारणी क्र.५.९**

**पूर्वी बेरड समुदायातील मुलींच्या शिक्षणाला मान्यता नसल्याची कारणे दर्शविणारी माहिती**

| अ.क्र. | शिक्षणाला मान्यता नसल्याची कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मुलींना शिक्षणाचा कोणताच फायदा होत नाही. | २४ | ४८.0 % |
| २ | मुलगी ही परक्याचे धन आहे. | २६ | ५२.0 % |
| | **एकूण** | **५0** | **१00.0 %** |

वरील सारणी क्र.५.९ वरून असे दिसून येते की पूर्वी वेरड समुदायातील बहुसंख्य (५२.0) लोकांच्या मते मुलींना शिक्षणाचा कोणताच फायदा होत नाही तर उर्वरीत

(४८.0%) वेरड लोकांच्या मते मुलगी ही परक्याचे धन आहे. तसेच तीच्या शिक्षणाची जवाबदारी आपली नाही दुसऱ्याची आहे, असे मत असल्याने वेरड समुदायात मुलींच्या शिक्षणाला मान्यता नव्हती.

**सारणी क्र.५.१०**

**सद्यपरिस्थितीतील बेरड समुदायातील मुलींच्या शिक्षणाला मान्यता असलेली कारणे दर्शविणारी माहिती**

| अ.क्र. | शिक्षणाला मान्यता असल्याची कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मुलींनाही शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. | २0 | ४0.0 % |
| २ | स्त्री-शिक्षणामुळे संपूर्ण कुटुंवाचा विकास होतो म्हणून. | १५ | ३0.0 % |
| ३ | मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून. | १५ | ३0.0 % |
| | **एकूण** | **५0** | **१00.0 %** |

वरील सारणी क्र.५.१० वरून असे दिसून येते की सद्यपरिस्थितीत वेरड समुदायातील बहुसंख्य (४0.0%) लोकांच्या मते, मुलींनाही शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. तर काही (३0.0%) वेरड लोकांच्या मते, स्त्री शिक्षणामुळे संपूर्ण कुटुंवाचा विकास होतो. व उर्वरीत (३0.0%) वेरड लोकांच्या मते मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते मुलींच्या शिक्षणाला मान्यता देताना दिसतात.

**सारणी क्र.५.११**

**बेरड समुदायातील पूर्वीच्या परिस्थितीतील व सद्यपरिस्थितीतील शिक्षणाविषयीच्या इतर बाबीं दर्शविणारी माहिती**

| अ.क्र. | परिवर्त्य | उत्तरांचे प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | मुलांना शिक्षण देत असल्यास कोणत्या इयत्तेपर्यंत देत होता? | लिहायला, वाचायला येईपर्यंत | ३३ | ६६.0 % |
| | | ७ वी पर्यंत | ८ | १६.0 % |
| | | १0 वी पर्यंत | ९ | १८.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00.0 %** |
| २ | सद्यपरिस्थितीत कोणत्या | पदवीपर्यंत | २0 | ४0.0 % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | इयत्तेपर्यंत देता? | पदव्यूत्तर पर्यंत | ३० | ६०.० % |
| | | **एकूण** | **५०** | **१००.० %** |
| ३ | शिकलेल्या मुलीचे तुमच्या समुदायात काय स्थान होते ? | निच्च | ५० | १००.० % |
| ४ | सद्यपरिस्थितीत कसे स्थान आहे? | उच्च | ५० | १००.० % |
| ५ | तुमच्या मते, शिक्षण घेतल्यामुळे जीवन सुखी वनू शकेल का ? | होय | ३४ | ६८.० % |
| | | नाही | १६ | ३२.० % |
| | | **एकूण** | **५०** | **१००.० %** |
| ६ | नसल्यास का ? | शिक्षणामुळे व्यक्ती अहंकारी स्वार्थी वनते. | २ | ०४.० % |
| | | फक्त आर्थिकहित पाहते. | ६ | १२.० % |
| | | एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीला कमी लेखते. | ८ | १६.० % |
| | | **एकूण** | **१६** | **३२.० %** |
| ७ | असल्यास कसे ? | जीवनातील सर्व क्षेत्रात योग्य वापर करून | १८ | ३६.० % |
| | | येणाऱ्या प्रत्येक अडचणीवर मात करून | १६ | ३२.० % |
| | | **एकूण** | ३४ | **६८.०%** |

वरील सारणी क्र.५.११ मध्ये वेरड समुदायातील पूर्वीच्या परिस्थितीतील व सद्यपरिस्थितीतील शिक्षणाविषयीची इतर माहिती व आकडेवारी दिलेली आहे तिचे विश्लेषण पुढीलप्रमाणे...

**मुलांचे शिक्षण :**

वेरड समुदायातील लोकाना पूर्वी मुलांना शिक्षण देत असल्यास कोणत्या इयत्तेपर्यंत देत होता? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्याकडून मिळालेल्या उत्तरादाखल माहितीवरून असे

दिसून येते की पूर्वी वेरड समुदायातील वहुसंख्य (६६ .0%) लोक आपल्या मुलांना लिहायला, वाचायला येईपर्यंत शिक्षण देत होते तर काही (१८ .0%) वेरड लोक मुलांना ७ वी पर्यंत तर उर्वरीत (१६ .0%) वेरड लोक मात्र आपल्या मुलांना १0 वी पर्यंतचे शिक्षण देत होते.

सद्यपरिस्थितीवावत विचार केल्यास पूर्वीच्या मुलांना शिक्षण देण्याच्या स्थितीमध्ये खूपच वदल झालेला दिसतो. सद्यस्थितीत वेरड समुदायातील वहुसंख्य (६0 .0%) लोक आपल्या मुलांना पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण देतात तर उर्वरीत (४0 .0%) वेरड लोक मात्र आपल्या मुलांना पदवीपर्यंतच्या शिक्षणाला मान्यता देतात.

**बेरड समुदायामध्ये शिकलेल्या मुलींचे स्थान :**

पूर्वी वेरड समुदायामध्ये शिकलेल्या मुलीचे स्थान हे निम्न असलेले आढळते, परंतु सद्यपरिस्थितीत मात्र वेरड समुदायामध्ये शिकलेल्या मुलीचे स्थान हे उच्च असलेले दिसून येते.

**शिक्षण घेतल्यामुळे जीवन सुखी बनू शकेल का?**

वेरड समुदायातील लोकांना तुमच्या मते, शिक्षण घेतल्यामुळे जीवन सुखी वनू शकेल का? असा प्रश्न विचारला असता मिळालेल्या उत्तरादाखल माहितीवरून असे दिसून येते की, वेरड समुदायातील वहुसंख्य (६८ .0%) वेरड लोकांच्या मते शिक्षण घेतल्यामुळे जीवन सुखी बनवू शकते. तर उर्वरीत (३२ .0%) वेरड लोकांच्या मते, शिक्षण घेतल्यामुळे जीवन सुखी बनू शकत नाही. तेव्हा वेरड लोकांना तुमच्या मते शिक्षण घेतल्यामुळे जीवन सुखी बनू शकेल का? असल्यास कसे व नसल्यास कसे? असा प्रश्न विचारला तेव्हा वेरड लोकांनी दिलेल्या उत्तरादाखल वेगवेगळी मते आणि कारणे आढळून आली त्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे...

वेरड समुदायातील वेरड लोकांना शिक्षण घेतल्यामुळे जीवन सुखी वनु शकते का? असल्यास कसे? असा प्रश्न विचारला तेव्हा त्यांच्याकडून अशी माहिती मिळाली की वहुसंख्य (३६ .0%) वेरड लोकांच्या मते, व्यक्ती शिक्षणाचा आपल्या जीवनात सर्व क्षेत्रात योग्य वापर करते, तर उर्वरीत (३२ .0) वेरड लोकांच्या मते, व्यक्ती शिक्षणामुळे येणाऱ्या अडचणीवर मात करते. अशाप्रकारे व्यक्ती आपल्या जिवनामध्ये शिक्षणाचा उपयोग करून आपले जीवन सुखी वनू शकते.

बेरड समुदायातील काही बेरड लोकांच्या मते शिक्षण घेतल्यामुळे जीवन सुखी बनू शकत नाही. तेव्हा नसल्यास कसे? असा प्रश्न विचारला असता दिलेल्या उत्तरादाखल माहितीवरून असे दिसून येते की बेरड समुदायातील बहुसंख्य (१६.0%) लोकांच्या मते शिक्षणामुळे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला कमी लेखते, काही (१२.0%) बेरड लोकांच्या मते शिक्षणामुळे व्यक्ती फक्त स्वत:चे आर्थिक हित पाहते तर उर्वरीत सर्वात कमी (४.0%) बेरड लोकांच्या मते, शिक्षणामुळे व्यक्ती अहंकारी व स्वार्थी बनते.